**महाराष्ट्र शासन**

**महाराष्ट्र राज्य सहकारी अपील न्यायालय मुंबई**

एपीजे हाऊस, ६ वा मजला, दिनशा वाच्छा रोड,चर्चगेट,मुंबई ४०० ०२०

Maharashtra State Co-operative Appellate Court,Mumbai

Apeejay House 6th flr.Dinshaw Vachha Road,Churchgate, Mumbai 400 020

## <u>सेवानिवृत्त गट ब अराजपत्रीत अधिकारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत</u>

## Appointment of RetiredGroup "B"Non-Gazetted Officers on contract Basis.

जनहित याचिका क्रमांक १५६/२०११ मधील न्यायनिर्णयानुसार महाराष्ट्र राज्य सहकारी अपील न्यायालय मुंबई व सहकार न्यायालय क्रमांक १ ते ४ मुंबई यांच्या अभिलेखाचे स्कॅनिंगचे कामकाज करावयाचे असून स्कॅनिंग पूर्व तयारी करण्यासाठी फायलींची विरळणी ए.बी.सी.डी.करण्याच्या अनुषंगाने शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ अनुसार सेवानिवृत्त गट ब अराजपत्रीत २ (दोन )अधिकाऱ्याची करार पध्दतीने तात्पुरत्या नियुक्तीकरीता पॅनल तयार करण्यासाठी इच्छूकता मागविण्यास्तव सदर जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे.

**अटी व शर्ती :**

१)सदर नियुक्ती १ **वर्षाकरीता** सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. संकीर्ण-2715/प्र.क्र.100/13, दिनांक 17 डिसेंबर, 2016 च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार करण्यात येणार आहे.

२) सेवानिवृत्त गट ब अराजपत्रीत अधिकारी संवर्गातील असावेत.

३) न्यायालयीन कामकाजाचा किमान ३ ते ५ वर्षांचा अनुभव असावा.

४) उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे चांगले ज्ञान असावे.

५) उमेदवाराचे वय 65 वर्षापेक्षा अधिक नसावे.

६) उमेदवार मुंबई अथवा लगतच्या जिल्ह्यात राहणारा असावा.

७) सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्यांच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

८) करारपध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्या विरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्ततावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

९) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. संकीर्ण-2715/प्र.क्र.100/13, दिनांक 17 डिसेंबर, 2016 मधील परिच्छेद २(ड) मधील इतर अटी व शर्ती नमुद केलेप्रमाणे राहतील.

१०) सेवा निवृत्त अधिकाऱ्यास सामान्य प्रशासन विभाग दि.१७.१२.२०१६ सोबतच्या परिशिष्ट-अ अनुसार मासिक पारिश्रमिक अनुज्ञेय राहील.

११) विभागास आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी अर्ज सादर केल्यास अशा अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जासंदर्भात शासनाशी केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जांना उत्तर देण्यात येणार नाही.

१२) मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार विभागाचा /समितीचा राहील

१३) आवश्यक अर्हता धारण करणाऱ्या इच्छुक सेवानिवृत्त गट ब अराजपत्रीत अधिकाऱ्यांनी त्यांचे अर्ज खालील माहितीसह मा.अध्यक्ष महाराष्ट्र राज्य सहकारी अपील न्यायालय मुंबई एपीजे हाऊस, ६ वा मजला, दिनशा वाच्छा रोड,चर्चगेट, मुंबई ४०० ०२० (दुरध्वनी क्रमांक 0२२-२२०४७६२७ ) यांचेकडे किंवा E-mail-pmscacmum1@gmail.com या मेल आयडीवर **दिनांक २५/७/२०१९ पर्यंत सकाळी ११.३०** पर्यंत सादर करावेत.

१) अर्जदाराचे संपूर्ण नांव

२) जन्म दिनांक

३) सेवा निवृत्तीचा दिनांक

४) ज्या विभागातून/कार्यालयातून सेवानिवृत्त झाले त्या विभागाचे /कार्यालयाचे नांव

५) सेवानिवृत्तीच्या वेळचे पदनाम व ग्रेड वेतन

६) सेवानिवृत्त होतेवेळी विभागीय चौकशी सुरु अथवा प्रलंबीत होती किंवा कसे

७) सध्याचा निवासस्थानाचा पत्ता

८) अर्जावर दोन स्वत:चे पासपोर्ट साईज फोटो

उपरोक्त मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. नियुक्ती प्रथमत: १ वर्षासाठी राहील. त्यानंतर आवश्यकतेनुरुप हा कालावधी वाढविण्यात येणार आहे. सेवा समाप्त करण्याचा/वाढविण्याचा अधिकार विभागाचा राहील.

(सुर्यकांत शिंदे)

अध्यक्ष,

महाराष्ट्र राज्य सहकारी अपील न्यायालय मुंबई